# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे

## हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कल्याण (प.) (सुभेदारवाडा)

## (२ जानेवारी २०१४ ते २ जानेवारी २०१५ शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष)

## वार्षिक अहवाल २०१८-२०१९

दिनांक : २२/१२/२०१८

**प्रमुख पाहुणे : मा. श्री. रोहन बोरगावकर**
B.Com., C.A.

**समारंभाचे अध्यक्ष : मा. श्री. पंडित बाबुराव चौधुले**

संचालक - ज.ए.इ. दादर व शालेय समिती अध्यक्ष - ज.ए.इ.चे हायस्कूल व ज्युनि. कॉलेज, कल्याण)

शाळेचे माजी विद्यार्थी, पारितोषिक ठेवीदार या शाळेचे आजी-माजी मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर, कर्मचारी, सेवक, सन्माननीय निमंत्रित, शाळेतील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी, उपस्थित पालक, बंधू आणि भगिनींनो आपल्या हायस्कूल व कनिष्ठ महाविंद्यालयाचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

### ❊ व्यवस्थापन ❊

शाळेच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी **श्री. पारुंडेकर जे. डी.** (बी.ए., बी.एड.)

उपमुख्याध्यापक पदी :

पर्यवेक्षक पदावर : **श्री. शेंडे आर. एच.** (बी.एससी., एम.ए.बी.एड)
**श्री. मेश्राम ए. वाय.** (बी.ए.,डी.एड)

हे कार्यरत आहेत.

शालेय समितीवर संस्थेने नियुक्त केल्याप्रमाणे संचालक मा. श्री. पंडीत बाबुराव चौघुले हे शालेय समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. तसेच १ जानेवारी २०१८ पासून श्री. पाटील जे. एन., श्री. झोपे भूषण बी., श्रीम. उपाध्ये तेजल जयंत, श्री. शेंडे आर. एच., श्रीमती प्रधान ए. पी. हे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. मा. मुख्याध्यापक श्री. पारुंडेकर जे. डी. हे पदसिध्द कार्यवाह म्हणून काम पाहतात.

### ❊ बदली / पदोन्नती ❊

१) १ जुलै २०१८ पासून श्री. पारुंडेकर जे. डी. (बी.ए., बी. एड.) हायस्कुल कल्याण (सुभेदारवाडा) येथेच पदोन्नतीने मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत.

२) १ सप्टेंबर २०१८ पासून श्री. मेश्राम ए. वाय. (बी.ए.,डी.एड.) हायस्कूल, कल्याण (सुभेदारवाडा) येथेच पदोन्नतीने पर्यवेक्षक पदावर कार्यरत आहेत.

## * सेवा निवृत्ती *

वार्षिक अहवाल वर्षामध्ये जुन २०१८ अखेर सौ. इनामदार समिधा श्रीकांत (बी. एस.सी., बी. एड.) ह्या सरकारी नियमाप्रमाणे सेवा निवृत्त झाल्या.

## * शैक्षणिक *

अ) १) फेब्रुवारी / मार्च २०१८ इयत्ता १२वी कला शाखेचा निकाल - ८३%
प्रथम क्रमांक - कु. सुतार त्राविका हरिश्चंद्र - ८१.६९%

२) इयत्ता १२वी -अकाऊंटींग व ऑडिटिंग - निकाल - १००%
प्रथम क्रमांक - कु. पाटील ज्योती मंगळदास - ७६.४६%

३) इलेक्ट्रॉनिक व टेक्नॉलॉजी - निकाल - ७८.२६%
प्रथम क्रमांक - कु. सोरे राहुल अशोक - ६१.५४%

ब) १) मार्च २०१८ इयत्ता १०वी शालान्त परीक्षा निकाल - ९७.८०%
प्रथम क्रमांक - कु. महाळुंगे साक्षी सखाराम - ९६.६६%
व्दितीय क्रमांक कु. वाणी प्रतिक मनोज - ९६.३३%
तृतीय क्रमांक कु. वैद्य प्रणित निखिल - ९६%

## * अग्रवाल ढाल (अक्षीकर स्कॉलर) *

संस्थेच्या सर्व शाळांमधील ज्या शाळेची शालान्त परीक्षेच्या निकालाची टक्केवारी दुसऱ्या क्रमांकांची असते त्या शाळेस **"अग्रवाल ढाल"** ही मानाची ढाल दिली जाते. या वर्षी ही ढाल आपल्या शाळेस मिळाली आहे. २५ सप्टेंबर २०१८ रोजी हा कार्यक्रम संस्थेच्या छ. ल. मुलांची शाळा दादर (सभागृहात) येथे संपन्न झाला. विशेष म्हणजे संस्कृत विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवणारे सर्वाधिक विद्यार्थी सुभेदारवाडा शाळेचे होते. एकूण २३ विद्यार्थ्यांनी संस्कृत मध्ये शालान्त परीक्षेला १०० पैकी ९९ गुण मिळवले.

## * कै. सुशांत संदीप वैद्य करंडक *

पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५वी) शिष्यवृत्ती परीक्षेत ज्या शाळेची उत्तीर्णतेची टक्केवारी जास्त असेल त्या शाळेस कै. सुशांत वैद्य स्मृती ढाल प्रदान करण्यात येते. ही ढाल प्रदान करण्याचा कार्यक्रम प्रतिवर्षी अक्षीकर दिनाच्या दिवशी करण्यात येतो. २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातही ढाल आपल्या शाळेस मिळाली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी कु. कोठावदे अंकित चंद्रकांत (इ. ५वी. अ)

## ※ शिष्यवृत्ती परीक्षा ※

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५वी) ला एकूण ४३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले त्या पैकी १८ विद्यार्थी पात्र झाले.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८वी) एकूण विद्यार्थी ५७ प्रविष्ठ झाले. त्या पैकी १५ विद्यार्थी पात्र झाले.

१) कु. वैद्य उमा उल्हास
२) कु. चौधरी उर्शिता चंद्रकांत
३) कु. रानडे साक्षी वैष्णवीप्रसाद
४) कु. ओक मधुरा अवधूत
५) कु. जुवळे आर्या महेश
६) कु. जतकर समृध्दी संतोष

यांना विशेष प्राविण्यासह शिष्यवृत्ती मिळाली.

## ※ शासकीय चित्रकला परीक्षा ※

१) सप्टेंबर २०१७ मध्ये झालेल्या चित्रकला परीक्षेचा निकाल
   १) एलिमेंटरी चित्रकला परीक्षा - ९२%
   २) इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा - ८४%
२) काळातलाव महोत्सव चित्रकला स्पर्धेत २०० विद्यार्थ्यांचा सहभाग.
३) सी. एम. चषक. ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग.
४) ठाणे वैभव चित्रकला स्पर्धा ८५० विद्यार्थी (इ. ५वी ते इ. ८वी) विद्यार्थ्यांचा सहभाग.
५) दरवर्षी संस्थेची स्पर्धा इतर स्थानिक स्पर्धा, सकाळ चित्रकला स्पर्धा,नवनीत चित्रकला स्पर्धा अश्या विविध स्पर्धांमध्ये शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होतात.

## ※ शैक्षणिक सहली ※

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९

१) इ. १०वी - वर्षा सहल - नंदनवन रीसॉर्ट, भिलवली वसई येथे आयोजित केली होती. सहलीत २०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

## ※ सांस्कृतिक, शालेय स्पर्धा व वाङ्:मय मंडळ ※

१) १ ऑगस्ट २०१८ - लोगमान्य टिळक पुण्यतिथी

लोकमान्य टिळक पुण्यतिथी च्या अनुषंगाने २ ऑगस्ट रोजी द. बा. बाहेकर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा पार पडल्या.

२) १५ ऑगस्ट २०१८ - स्वातंत्र्य दिन साजरा केला. - समूहगीत, एन.सी.सी. विद्यार्थ्यांची प्रत्यक्षिके सादर.

३) ५ सप्टेंबर २०१८ - शिक्षक दिन साजरा केला शिक्षक दिना निमित्त इ. १०वी, १२वी च्या विद्यार्थींनी शालेय कामकाज केले.

४) १४ सप्टेंबर २०१८ - हिन्दी भाषा दिन साजरा केला गेला.

५) २५ सप्टेंबर २०१८ अक्षीकर दिन -नेने ढाल, अग्रवाल ढाल, कै. सुशांत संदीप वैद्य करंडक प्रदान सभारंभात सर्व शिक्षक-शिक्षकेतर पारितोषिक प्राप्त विद्यार्थी यांचा सहभाग.

६) २ ऑक्टोबर २०१८ - महात्मा गांधी जयंती व भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी केली गेली. विद्यार्थ्यांचा वंदनाचा कार्यक्रम पार पडला.

१५ ऑक्टोबर २०१८ नवरात्री सरस्वती पुजन इ. ९वी त प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांच्या हस्ते पार पडले. यावर्षी कुमारी नुपुर श्रीकांत गुप्ते व कुमार हिमांशु गोयल यांच्या हस्ते ही पुजा केली गेली.

बुधवार दि. ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी सरदार पटेल यांची जयंती व श्रीमती इंदिरा गांधी पुण्यतिथी साजरी झाली.

२६ नोव्हेंबर २०१८ - संविधान दिन - संविधान उद्देशिका - विद्यार्थ्यांचे वाचन झाले.

२८ नोव्हेंबर २०१८ रोजी महात्मा जोतिबा फुले यांची पुण्यतिथी

दिवाळी सुट्टी मध्ये सुभेदारवाडा कट्टा तर्फे आयोजित रांगोळी स्पर्धा व किल्ला स्पर्धा दोन गटात ३० विद्यार्थी सहभागी. किल्ली स्पर्धेत प्रथम क्रमांक पाप्त यशस्वी विद्यार्थी इ. १० वी - ब चे आहेत.

६ डिसेंबर २०१८ - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा.

वाड्मय मंडळातर्फे विद्यार्थ्यांच्या वाचन व लेखन कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी "तरंग" या हस्तलिखिताची निर्मिती

## * क्रीडा विभाग *

१) शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ या वर्षामध्ये जिल्हा स्तरीय क्रीडास्पर्धा, विभागीय क्रीडा स्पर्धा मध्ये कब्बडी, फुटबॉल, क्रिकेट, टेबल टेनिस इत्यादि सारख्या सांघिक खेळामध्ये व जलतरण, बुध्दिबळ, कराटे, ज्युडो, कुस्ती, जिमनॉस्टिक या सारख्या वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. क.डो.म.पा. आयोजित क्रीडा स्पर्धा मध्ये २५० विद्यार्थी सहभागी.

२) दिनांक १७ डिसेंबर २०१८ ते २० डिसेंबर २०१८ - शालेय क्रीडा महोत्सव साजरा केला. या क्रीडामहोत्सवा मध्ये कबड्डी, लंगडी, डॉजबॉल या सारख्या सांघिक स्पर्धा व गोळाफेक, चमचा लिंबु, दोरी उड्या अश्या वैयक्तिक विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्य, विभागीय पातळीवरील खेळाडू

१) **कुस्ती** – राज्य पातळीवर सहभाग

कु. पाटील लावण्या गणेश (इ. ८वी क)

अमरावती येथे राज्यपातळीवर निवड. दि. १४ जुलै २०१८ पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त.

विभागीय पातळीवर निवड

१) कु. तरे विकी विजय (इ. १२ वी ब)
२) कु. तरे हरेष विजय (इ. ११वी इलेक्ट्रॉनिक)
३) कु. केणे मयूर सुनिल (इ. ११वी इलेक्ट्रॉनिक)
४) कु. कारभारी भाविक संजय (इ. ८वी क)
५) कु. लोखंडे रोहीत नवनाथ (इ. ९वी क)

२) **जलतरण** – कु. म्हात्रे साक्षी मधुकर (इ. ९वी ड) विभागीय पातळीवर जलतरण स्पर्धेसाठी निवड.

४) **कराटे** – कु. टाकळकर नंदिनी नितीन (इ. ६वी क)

खेला कराटे ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पीयनशिप स्पर्धेत ब्रांझ मेडल.

२२ जुलै २०१८ पुणे येथे झालेल्या काता स्पर्धेत - सुवर्ण पदक

५) **योगासन** – कु. रिसबुड निधीश्री वैभवराज (इ. ६वी ब) - विभागीय पातळीवर निवड.

६) **रोप मल्लखांब** –

कु. रिसबुड निधिश्री वैभवराज अलिबाग येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत - २४वा. क्रमांक

७) **तायक्कांदो** – कु.सुखदरे मंथन अजित (इ. ९वी ई) तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड.

८) **बॅडमिंटन** – कु. ऋतुजा अतुल चिंचणसुरे (इ. ६वी-अ) ठाणे येथे झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत चषक व प्रमाणपत्र देऊन गोरविण्यात आले.

## * बहिः शालेय परीक्षा *

गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षा, MTS, MAT, M.P.S.P. स्कॉलरशिप परीक्षा, डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक परीक्षा, संस्कृती संवर्धक प्रतिष्ठान - रामायण कथा परीक्षा व गीतापठण स्पर्धा, नाट्य स्पर्धा या मध्ये विद्यार्थी घवधवीत यश प्राप्त करतात.

१) MAT परीक्षा

११ विद्यार्थी प्रविष्ठ ३ विद्यार्थी पास

२) MTS परीक्षा

२० विद्यार्थी प्रविष्ठ (एप्रिल २०१९ ला परीक्षा)

३) M.P.S.P. प्रज्ञा शोध परीक्षा

इ. ६वी साठी १३ विद्यार्थी प्रविष्ठ

४) **महाराष्ट्र ज्ञानपीठ परीक्षा** - गणित, इंग्रजी, संस्कृत, हिन्दी या विषयांसाठी विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार आहेत.

५) **होमी भाभा स्पर्धा परीक्षा** - इ. ६वी व इ. ९वी साठी १३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. इ. ९वी तून तीन विद्यार्थींची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली

कु. वैद्य उमा उल्हास

कु. चौधरी उर्षिता चंद्रकांत

कु. रानडे साक्षी वैष्णवीप्रसाद

६) **स्कॉलरशिप परीक्षा स्पर्धा**

२०१८-२०१९ या वर्षात आमच्या शाळेतुन इ. ५वी साठी ५७ विद्यार्थी तर इ. ८वी साठी ३९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले असुन परीक्षा जाने/फेब्रु. महीन्यात होणार आहे.

७) **महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा - विषय संस्कृत**

२७ एप्रिल २०१७ ला परीक्षा झाली होती त्यात एकूण ४३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यातून

कु. चौधरी उर्षिता चंद्रकांत १४ वी रँक

कु. वैद्य उमा उल्हास १९वी रँक

कु. ओक मयुरा अवधूत २० वी रँक

८) **इंग्रजी मॅरेथॉन स्पर्धा परीक्षा**

आपल्या शाळेतून एकूण २११ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. एकूण २०९ विद्यार्थी परीक्षेस बसले. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन १९९ विद्यार्थी स्टेट लेव्हल साठी पुढे जाणार आहे.

९) **संस्कृतिक संवर्धन प्रतिष्ठान ठाणे तर्फे रामायण कथा**

१० विद्यार्थी स्पर्धेत सहभाग

१०) **कल्याण डोंबिवली महानगर पालिका आयोजित निबंध स्पर्धा**

"माझा कचरा माझी जबाबदारी" या विषयावर ४ विद्यार्थी स्पर्धेत सहभागी

११) पर्यावरण दक्षता मंच तर्फे

पथनाट्य, गायन, नृत्य (सोलो), चित्रकला - १८ विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

१२) **पार्थिय शैक्षणिक सामाजिक ट्रस्ट, कल्याण आयोजित**

"I am Change Maker" या स्पर्धेसाठी २३ डिसेंबरला प्रकल्प सादर करणार आहेत.

## * विज्ञान विभाग *

१) क.डो.म.पा. तर्फे आयोजित- CRC विज्ञान प्रदर्शन शाळा क्रमांक १ -
मध्ये झालेल्या विज्ञान प्रसर्शनात कुमार पारस दिलीप सातपुते (इ. ८वी अ) याने किटकनाशकां पासुन अन्न सुरक्षा या विषयावर प्रकल्प केला होता. त्याच्या या प्रकल्पास दुसरा क्रमांक प्राप्त झाला. किडलँड स्कूल डोंबिवली येथे पुढील लेवल साठी निवड झाली त्यात ही त्याला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

२) **शालेय पातळीवर** - दि. १२/१२/२०१८ रोजी विज्ञान प्रदर्शन झाले. छोटे-मोठे ७० प्रकल्प घेऊन सुमारे १५० विद्यार्थी सहभागी झाले.

३) शिक्षण विभागा तर्फे होणाऱ्या तालुका पातळीवर विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी सहभागी होतात.

## * निकाल सुधार विभाग *

१) इयत्ता १०वी व १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी आठवडी सराव परीक्षा घेतली जाते. प्रत्येकी दोन विषयाचे ३० गुणांचे २ संच, सहामाही अभ्यासक्रम व संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत प्रत्येकी एक संच विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतले जातात.

## * स्काऊट गाईड *

सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेत स्काऊट-गाइडचे एकूण १० युनिट स्थापन करण्यात आले असून ६३९ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

NCC - शाळेत NCC उपक्रम राबवीला जातो.

## * पालक शिक्षक संघ *

या शाळेत पालक-शिक्षक संघ कार्यरत असून पालक-शिक्षक संघाच्या सभे मध्ये शाळेच्या हिताच्या दृष्टिने व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विचार विनिमय करुन निर्णय घेतले जातात.

## * विशेष (इतर) उल्लेखनीय *

१) शासनाच्या निर्देशानुसार दि. २७/११/२०१८ ते २८/११/२०१८ रोजी शाळेत गोवर, रुबेला लसीकरणाचा कार्यक्रम पार पडला.

२) श्री. डी. एस. कुलकर्णी माजी विद्यार्थी यांना महाराष्ट्र शासनातर्फे ५ डिसे. २०१८ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र / आदर्श ग्रंथपाल पुरस्कार देण्यात आला.

३) शनिवार दि. ०८/०९/२०१८ रोजी सुभेदारवाडा कट्टा चॅरीटेबल ट्रस्ट तर्फे ४० वे पुष्प समर्पित स्तुत्य उपक्रम कथाकथनाच्या माध्यमातून पार पडला. सेक्सपिअरला ४०० वर्षे पूर्ण झाली या प्रित्यर्थ ३३ अजरामर कलाकृती असलेल्या नाटकांपैकी अॅथेल्लो या नाटकातील मुख्य पात्र अॅथेल्लो याची कथा सुभेदारवाड्याचे माजी विद्यार्थी श्री. प्रभाकर संत सर यांनी सांगितली.

४) रोटरी क्लब ऑफ जुहू यांच्या मार्फत आपल्या शाळेत सौ. शुभा पाध्ये नगरसेविका कल्याण, यांच्या हस्ते व्हेंडींग व सॅनीटरी पॅड डिस्पोजल मशीन बसविण्यात आहे. तसेच इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा श्रीमती माधवी कुलकर्णी यांनी वरील प्रकारची मदत शाळेला केली आहे.

५) इ. ५वी ते इ. १२ वी पर्यंत च्या विद्यार्थ्यांसाठी "**ताणतनाव निमूर्लन**" कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

६) श्री. सतिश भिडे यांचे स्वातंत्र्य वीर सावरकर चरित्रावर व्याख्यान झाले.

७) शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थ्यां मार्फत आरोग्य तपासणी चा कॅम्प आयोजित करण्यात आला.

८) अभ्यासक्रमात कलारसास्वाद या नव्याने अंतर्भूत झालेल्या विषयानुषंगाने रसग्रहणात्मक व्याख्यानाचे शालेय विद्यार्थ्यां करिता आयोजन केले होते.

व्याख्याता - श्रीम. मृदुला गडनीस (कर्जत)

विषय : "**चित्रे बोलतात**"

*या शाळेवर उदंड प्रेम करणाऱ्या ज्ञात-अज्ञातांचे ऋण निर्देश व्यक्त करून हा अहवाल पूर्ण करीत आहे.*

**श्री. पारुंडेकर जे. डी.**

मुख्याध्यापक